मोटार अपघात दावा क्र.६६/२०२३
सुरेखा व ईतर वि. मारूती व ईतर
नि.क्र.१८

गैरअर्जदारा क्र.३ करिता उलट तपास विधीज्ञ श्रीमती ए.एस.झांपले यांच्या वतीने

१. महेश याला एक भाऊ व एक बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेश हा सर्वात मोठा होता. त्याचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले होते. महेशचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा १२ वी ची टि.सी.दाखल केलेली नाही. मी त्याची १२ वी ची टि.सी.दाखल करू शकते.

२. माझ्या मुलाचा किती तारखेला अपघात झाला ते सांगता येत नाही. अपघात ४.०० वाजता झाला. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाला त्यावेळी मी घरी होते त्यामुळे मी स्वतः अपघात पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्या वाहनाचा अपघाता झाला व कसा झाला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यानंतर चार ते पाच दिवसांनी पोलीस ठाण्यात माझ्या पतीने फिर्याद दिली आहे. मी अपघाताबाबत चौकशी केली होती. मला माझा मुलगा चालवित असलेल्या मोटार सायकलचा क्रमांक सांगता येत नाही. ती मोटार सायकल महेशची होती. ती त्याने घेतली होती परंतू त्याच्या नावावर झालेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी महेशने हेल्मेट घातलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अपघात हा लातूर अंबेजागाई रस्त्यावर राजेवाडीला जाणा–या फाटयाच्या मध्यभागी झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने फिर्याद देताना मोटार सायकल टिप्परवर आदळली असे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझ्या मुलाच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे. मी रुबाब पान शॉपचे परवाना पत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोद पेट्रोलपंपाच्या आजूबाजूला चार ते पाच पानटपरी असतील. मयत महेश याला दररोज खर्च वजा जाता रू.७००/– मिळत होते याचा लेखी पुरावा दाखल केलेला नाही. मयत महेश याचे लग्न झालेले नव्हते. महेशचे वाहन चालविण्याचे लायसन्स दाखल केलेले नाही. मी महेशचे वाहन चालविण्याचे लायसन्स दाखल करू शकते.

३. हे म्हणणे खरे नाही की, महेश याचा लातूर रेणापूर रस्त्यावर राजेवाडी फाटा येथे अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेशचे पान शॉप होते

**मोटार अपघात दावा क्र.६६/२०२३**
**सुरेखा व ईतर वि. मारूती व ईतर**
**नि.क्र.१८**

हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, त्याला पान शॉपमधून दररोज रू.७००/– उत्पन्न मिळत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझ्या मुलाच्या चुकीमुळे आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातानंतर चार दिवसांनी टिप्परचा विमा असल्यामुळे त्याला खोटेपणाने अपघातात गुंतविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात काय मजकूर लिहीला आहे ते मला माहित नाही.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2025.12.16 11:29:39 +0530

(पी.पी.केस्तीकर)

दि.१५/१२/२०२५

तदर्थ जिल्हा न्यायाधीश–२ व
पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,
लातूर